बीड । मंगळवार

१५.०७.२०२५

वर्षे : ५ अंक : १०५

किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● https://marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 पान:१

# शिक्षक होण्याचा भाव फुटला, १५ ते १८ लाख 'प्लस'?

# पैशांच्या मागणीनं उमेदवारांमध्ये नैराश्य

**● राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांसह अनुदानित शाळांमधील शिक्षकांच्या दुसऱ्या टप्प्यातील भरती प्रक्रियेच्या मुलाखती सुरू आहेत. यामध्ये काही अनुदानित संस्थाचालकांनी उमेदवारांची आर्थिक मागणी होत असल्याचे प्रकार समोर आले आहे.**



**मुंबई । प्रतिनिधी**

भरतीसाठी तब्बल १०, १५ ते १८ लाख प्लसपर्यंत भाव फुटल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे भरती प्रक्रियेतील या प्रकाराने उमेदवार हेराण असून, दाद मागायची तरी कोणाकडे या विवंचनेत आहे.

राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांसह अनुदानित शाळांमधील शिक्षकांच्या दुसऱ्या टप्प्यातील भरती सुरू आहे. यात उमेदवारांचं आर्थिक छळवणूक सुरू असल्याचे प्रकार समोर येत आहेत. मुलाखतीदरम्यान लाखो रुपयांची मागणी केली जात असल्याने, उमेदवार नैराश्यात जात आहे. यामुळे शिक्षक भरतीच्या मुलाखतीबाबत सर्व प्रक्रिया मूल्यमापनसुद्धा इन कॅमेरा होणे आवश्यक आहे, अशी मागणी पुरोगामी शिक्षक संघटनेनी केली आहे.

काही संस्थाचालकांनी गुणवत्तेच्या आधारे समोर आलेल्या उमेदवारांना कोणतीही तक्रार न करता आपल्याकडे मुलाखात घेऊन रुजू करून घेत असले, तरी अशा संस्था बोटावर मोजण्या इतक्याच आहेत, असे जाणकारांचे म्हणणे आहे. त्यामुळे संस्थाचालकांना देण्यात आलेल्या मुलाखतीचे सर्व अधिकार काढून घ्यावेत, अशी मागणी होत आहे. राज्यात शिक्षक भरतीचा दुसरा टप्पा सुरू असून त्यात शिक्षकांच्या ८ हजार ५५६ रिक्तपदांची भरती केली जात आहे. पवित्र पोर्टलच्या प्रमाणित कार्यपद्धतीनुसार, मुलाखातींचे छायाचित्रण करणे अपेक्षित आहे. मुलाखत, वर्ग निरीक्षण आणि विद्यार्थी गुणसंख्येला प्रत्येकी दहा गुण दिले जाणार आहेत.

या सर्व प्रक्रियेवर राज्य शिक्षक परिषदेचे कार्यवाह शिवनाथ दराडे यांनी शिक्षक अभियोग्यता चाचणी झाल्यानंतर या संस्थेमध्ये पात्र उमेदवाराला पाठवले जाते, त्याची मुलाखत इन कॅमेरा झाली पाहिजे. त्यातून योग्य उमेदवारांची निवड होईल, असे सांगितले.

# विनायकराव मेटे यांच्या जयंती निमित्त शिवसंग्रामचे मुंबईत जोरदार शक्तिप्रदर्शन

## विनायकराव मेटे यांच्या आठवणींना उजाळा देताना अनेकांच्या डोळ्यात अश्रू



- **निष्ठा काय चीज असते ती पाहायच असेल तर त्यांनी मेटे साहेबांच्या शिवसंग्रामला पहावे - डॉ. ज्योती मेटे**
- **सुप्रद्धी 'छावा' चित्रपटाचे दिग्दर्शक लक्ष्मण उतेकर यांनी वाहिली श्रद्धांजली**
- **निष्ठावंत शिवसंग्राम कार्यकर्त्यांना पाच लाख रुपयांचे विमा सुरक्षा कवच**

**मुंबई । प्रतिनिधी**

शिवसंग्रामचे संस्थापक अध्यक्ष दिवंगत लोकनेते विनायकराव मेटे यांची जयंती भारतीय क्रीडा मंदिर, वडाळा येथे दि. १३ जुलै रविवार रोजी दुपारी ०४:०० वाजता मुंबई शिवसंग्रामच्या वतीने साजरी करण्यात आली.आठवणीतील मेटे साहेब या अभिवादन कार्यक्रमास अनेक मान्यवरांसह प्रशासकीय सेवेतील सनदी अधिकारी आणि सुप्रसिद्ध 'छावा' चित्रपटाचे दिग्दर्शक लक्ष्मण उतेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी अनेकांनी विनायकराव मेटे

▶▶ उर्वरित पान २ वर

# काळ्या बाजारात चालवलेले रेशनिंगचे धान्य धारूरमध्ये पकडले

## होळचे राशन दुकानदार अशोक घुगेकडून माल आणल्याची कबुली

### राशनच्या धान्याची सर्रास काळया बाजारात विक्री ;महसूल विभाग करतोय तरी काय ?

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील होळ येथील राशन दुकानातून टेम्पोने काळ्या बाजारात विक्रीसाठी जात असलेला गहू पोलिसांनी पाठलाग करून धारूर शहरातील एका दुकानासमोर पकडला. ही कारवाई पोलिसांनी सोमवारी (दि.१४) दुपारी ४.३० वाजण्याच्या सुमारास केली. याचा पंचनामा सुरू असून पुढील कार्यवाही केली जाईल, अशी



माहिती धारुरचे सहाय्यक पोलीस निरीक्षक देविदास वाघमोडे यांनी दिली आहे. दरम्यान, सदरील धान्य होळ येथील राशन दुकानदार अशोक तुकाराम घुगे याच्याकडून विक्रीसाठी आणल्याची कबुली वाहनचालकाने दिली आहे.

आडस येथील चौकात उभे असलेल्या पोलिस कर्मचाऱ्यांना आडसमधून धारूरच्या दिशेने जात असलेला छोटा टेम्पो (क्र.एम.

▶▶ उर्वरित पान २ वर

# 'जनसुरक्षा नव्हे जनमुस्कटदाबी!'

## विधेयकाच्या विरोधात सामाजिक कार्यकर्त्यांचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने : डॉ.गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाने विधिमंडळ अधिवेशनात मंजूर केलेले जनसुरक्षा विधेयक २०२५ हे लोकशाहीला घातक असून अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणणारे आहे, असा आरोप करत आज दि.१४ सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार निदर्शने करण्यात आली. सामाजिक कार्यकर्ते व माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे



जिल्हा प्रचारप्रमुख डॉ. गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन पार पडले. यावेळी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, राज्यपाल पी.सी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्यासाठी मागणीचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून सादर करण्यात आले. निदर्शनात

▶▶ उर्वरित पान २ वर

# गेवराईकरांसाठी दर सोमवारी उपलब्ध राहीन: बाळराजे पवार

**●पवारांच्या जनता दरबारास नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग**



**●जनता दरबारातील महत्त्वांचे मुद्दे**

- पंतप्रधान घरकुल आवास योजनेंतर्गत चालु असलेल्या लाभार्थ्यांना पहिला व दुसरा हाप्ता वितरण करणे
- तसेच पंतप्रधान घरकुल आवास योजनेंतर्गत लाभार्थ्यांना शासन निर्णयानुसार प्रती पाच ब्रास वाळु तात्काळ उपलब्ध करुन द्यावी
- शहरातील नाले सफाई , तसेच वार्डा वॉर्डात बंद असलेली लाईट तात्काळ चालु करावी अशा अनेक समास्यावर जनता दरबारात चर्चा करण्यात आली

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराईची जनता आणि आमचं पवार घराणं, हे नाते विश्वासाने घट्ट झालेले आहे. पिढ्यांनापिढ्या आम्ही एकमेकांशी जोडलोत. गावगाडा सांभाळला की नाही, हे गेवराईकरांना चांगले माहित आहे. यापुढे ही, गेवराई शहरातील जनतेची गाऱ्हाणी ऐकून घेण्यासाठी दर सोमवारी गेवराई नगर परिषदेच्या सभागृहात येणार आहे. अशी स्पष्ट भूमिका बाळराजे पवार यांनी येथे बोलताना मांडली आहे. सोमवार ता. १४ रोजी बाळराजे पवार यांनी गेवराई नगर परिषदेच्या सभागृहात आढावा बैठक घेऊन शहरातील नागरीकांच्या समस्या जाणून घेतल्या.

ते म्हणाले, नगरपालिका ही संस्था शहरातील समास्यांचे निराकरण करण्याचे माध्यम आहे. त्याठिकाणी कोणी ही राजकीय हस्तक्षेप करणे योग्य नाही. विस वर्षांपूर्वी गावाची परस्थीती काय होती हे जनतेला माहीती होती व बदलेली परिस्थिती जनतेच्या समोर आहे चार वर्षांपासून प्रशासक आहे या काळात जनतेच्या अनेक समास्या रखडलेल्या आहेत त्या समास्याचे निराकरण झाले पाहिजे म्हणून आपण यापुढे प्रत्येक सोमवारी नागरिकांसाठी मी व माझे सर्व मा.नगराध्यक्ष नगरसेवक नगरपालिकेत उपस्थित रहावुन समास्या सोडवणार आसल्याचे ही बाळराजे पवार यांनी सागितले आहे. स्वच्छ गेवराई सुंदर गेवराईचे जनक लोकप्रिय लोकनेते बाळराजे पवार यांनी गेवराई

▶▶ उर्वरित पान २ वर

# लोकजागृती आणि लोकशिक्षणातून समाजाला दिशा देण्याचा प्रयत्न करू: ॲड. अजित देशमुख

**रांजणगाव । प्रतिनिधी**

सध्या समाजाला चांगल्या कार्यकर्त्यांची आवश्यकता आहे. त्याचबरोबर वेगवेगळ्या मुद्द्यांवर लोकशिक्षण आणि लोक जागृती करणे आवश्यक आहे. संघटन असल्याशिवाय जनतेचे लहान लहान प्रश्न सुटत नाहीत. आणि त्यांना मार्गदर्शन होत नाही. त्यामुळे स्वराज्य जनजागृती परिषदेची स्थापना केली असून या माध्यमातून आपण जनतेचे प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करू, असे प्रतिपादन स्वराज्य जन जागृती परिषदेचे अध्यक्ष ड. अजित एम. देशमुख यांनी केली आहे.



स्वराज्य जनजागृती परिषदेची आज रांजणगाव येथे विश्वस्त मंडळाची पहिली सभा पार पडली. या सभेमध्ये ते बोलत होते. ते पुढे म्हणाले की, शेतकरी विद्यार्थी आणि कष्टकऱ्यांचे अनेक प्रश्न सध्या भेडसावत आहेत. या सर्व प्रश्नांवर एकत्रित येऊन चर्चा करण्याची गरज निर्माण झाली आहे. कार्यकर्त्यांमध्ये काम करण्याची क्षमता आहे. त्यामुळे असे सर्व कार्यकर्ते परिषदेच्या माध्यमातून एकत्र करून समाजाला दिशा देण्यासाठी सर्व कार्यकर्त्यांनी प्रयत्न करावेत. नवी पिढी आदर्श घेईल असे काम परिषदेच्या माध्यमातून झाली पाहिजे, असेही ते म्हणाले.

महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये लवकरात लवकर पोहोचण्यासाठी यावेळी चर्चा करण्यात आली. वेगवेगळ्या कार्यक्रमांच्या माध्यमातून लोकांपर्यंत कसे पोहोचता येईल, यावर काही निर्णय घेण्यात आले.

परिषदेचे उपाध्यक्ष संदीप जगताप, सातारा यांनी आपले विचार मांडताना म्हंटले की, परिषदेत काम करण्यासाठी चारित्र्यसंपन्न लोकांना संघटित करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. जास्तीत जास्त तरुणांचा समावेश करून घेण्यासाठी प्रत्येक कार्यकर्त्यांनी लक्ष केंद्रित करावे. त्याचप्रमाणे संघटन मोठे होण्यासाठी योग्य निर्णय घ्यावे लागतील.

परिषदेचे कोषाध्यक्ष शिवाजी खेडकर, पुणे यांनी परिषद केवळ महाराष्ट्रात नाही तर महाराष्ट्राच्या

▶▶ उर्वरित पान २ वर






# मैं बीज हुं, आदत है मेरी, बार बार उग जाने की !

कवितेच्या ओळी अनुषंगिक वाटत असल्या तरी त्या तंतोतंत लागू पडणाऱ्या आहेत. त्याचं कारण असं आहे की, धनंजय मुंडे हे नेतृत्व संपवण्याचा प्रयत्न होण्याची ही काही पहिली वेळ नाही! तसं यावेळी जरा अतीच झालं म्हणावं लागेल मात्र अशा प्रकारचे आघात हे या व्यक्तीसाठी काही नवीन नाहीत.

आयुष्यात लढविलेली पहिली जिल्हा परिषद निवडणूक ही त्या सुप्त संघर्षाची सुरुवात होती, सोप्या आणि जवळच्या जागा सोडून त्या काळी म्हणजे २००२ साली बीड जिल्ह्याची गडचिरोली म्हणवल्या जाणाऱ्या पट्टीवडगाव सर्कल मधून लढावे लागले. कदाचित संघर्ष हा यांच्या पाचवीला पुजलेला असावा, त्यामुळे आजवर जे मिळाले त्यातले सहज हाती लागले असे काहीच नाही.

कधी नियतीने तर कधी व्यक्ती द्वेषाने धनंजय मुंडे यांना अनेक हल्ले सहन करून प्रतिहल्ला न करता संयमाने परतवून लावावे लागले; याची शेकड्याने उदाहरणे देता येतील. पण त्या प्रत्येक आघातातून कुणालाही न दुखावता किंवा फारसे डॅमेज न होऊ देता अत्यंत धीरोदात्त पणे लढून धनंजय मुंडे इथपर्यंत पोचले. त्यात सगळ्यात मोठा वाटा प्रभू वैद्यनाथ नगरी अर्थात परळीतील जनतेचा आहे. आजवर परळीची ही माय बाप जनता प्रत्येक वेळी, प्रत्येक संघर्षात धनंजय नावाभोवती एक अभेद्य तटबंदी बनून उभी राहिली आहे. म्हणूनच नेहमी म्हटले जाते की एखादे नेतृत्व घडायला अनेक दशके लागतात, अनेक प्रकारचा त्याग, बलिदान, उपासना आणि संघर्ष त्यामागे दडलेला असतो. ज्याने या सर्व गोष्टी सहन केल्यात त्याला संपवण्याची सुपारी तितकी सोपी नाही!

लोकसभा निवडणुकीतील धनंजय मुंडे यांचे समर्पण सर्वांनी डोळ्यांनी पाहिले. निसटता पराभव झाला तो स्वीकारून पुन्हा ते कामाला लागले. विधानसभा निवडणुकीत इतर मतदारसंघात ३२ पेक्षा अधिक सभा घेतल्या. इतकेच नाही तर स्वतः उमेदवार असून सुध्दा अगदी मतदानाच्या आदल्या रात्री अगदी पहाटेच्या दोन वाजेपर्यंत आपल्या गेवराई च्या बंधूंच्या प्रचारार्थ बैठका घेत होते. परळीच्या अभेद्य किल्ल्याने धनंजय मुंडे या नावाभोवती महाराष्ट्रातील क्रमांक दोनची लीड उभी केली. त्यादिवशी अनेकांनी बांगड्या फोडल्या... अनेक आरोप केले त्या सर्वांच्या तोंडावर स्वतः निवडणूक आयोगाने क्लीनचीट चिटकवली, तरीही बदनामी सुरूच! पण खवळलेला विरोध




आणि संपवायची सुपारी परळी पासून शेकडो किलोमीटर वरती शिजत होती; त्यांना हवी होती फक्त एक संधी!

जिल्ह्यात घडलेल्या एका दुर्दैवी घटनेच्या आडून अशी काही संधी साधवून घेतली की.... बापरे! १६५ दिवस एका सर्वसामान्य नेतृत्वाला संपवण्यासाठी मीडिया ट्रायल? देशात कधी आजवर झाली नसेल; किती मोठमोठे आहेर कुणाकुणाला देण्यात आले, याची अनेकांना कल्पना आहे. खाजगीत विरोधक सुध्दा आता ते बोलून दाखवतात. किंबहुना आता सर्वसामान्य जनतेला सुध्दा ते कळून चुकलं आहे.

जातीयवादाचा ठपका ठेवून बदनामी, घोटाळ्यांचे आरोप ध चा म करून बातम्यांची पेरणी तर इतकी की अगदी पिंपळाचे पान गळाले अशी वस्तुस्थिती असताना धनंजय मुंडे यांच्या मुळे पिंपळगाव जळले, अशा बातम्या दाखवून त्यावर डिबेट घडवून आणल्या गेल्या... अगदी, आई, भाऊ, मुली – बाळी यांच्या पर्यंत बदनामी? कशासाठी? उत्तर आहे केवळ सुपारी! या व्यक्तीला राजकारणातून संपवायचे याची सुपारी!

धनंजय मुंडे या माणसाला मुळात कधी जात शिवलेली नाही, महापुरुषांच्या जयंती मध्ये भाषणे करताना ते आवर्जून सांगतात की महापुरुषांच्या कार्याचा आदर्श घ्या, त्यांना जातीत वाटून घेऊ नका. इतकेच काय तर राजकारणात संधी देताना सोशल इंजिनिअरिंग साधावी ती धनंजय मुंडे यांनीच! त्याचीही शेकडो उदाहरणे सांगता येतील. पण नाव सांगितले की त्याची जात शोधायची ही पद्धत सध्या सुरू आहे, त्यामुळे नाव टाळलेले बरे. विरोधीपक्षनेते, आमदार, मंत्री अशा विविध पदांवर काम करताना, त्यांच्या सभोवती सर्वाधिक अधिकारी कर्मचारी हे मराठा समाजाचे राहिले आहेत. त्यामुळे जातीचे लेबल लावून त्यांची बदनामी करणे म्हणजे अत्यंत छोटी सोच ठरेल.

मीडिया ट्रायल, व्यक्तिगत आरोप, बदनामी हे सगळे इतक्या टोकाला पोचवले गेले की त्यांचा परिणाम स्वतःच्या तब्येतीवर सुध्दा झाला. ज्या माणसाच्या जिभेवर माता सरस्वती वास करते, त्या व्यक्तीला एका आजारामुळे जवळ जवळ तीन महिने बोलता येईना, सतत माणसात राहणे, बोलणे, भाषणे, संवाद अशी आयुष्याची शिदोरी असलेल्या व्यक्तीला तीन महिने बोलता येत नाही, तेव्हा त्यांच्या मनाला त्याच्या किती वेदना होत असतील? पण दुसरीकडे राजीनामा आणि दीर्घकाळ मुंडेंचे मौन याचा अर्थ सुपारी बहाद्दर गँग ने काढला की आता धनंजय मुंडे संपले!

राज्यात स्वकर्तृत्वावर मोठे झालेले व आपल्या पक्षासह मित्रपक्षात देखील तितकेच वजन असणारे धनंजय मुंडे हे नाव गप्प बसणाऱ्या किंवा सहज सर्वकाही मागे सोडून देणाऱ्यापैकी नाही. याची प्रचिती आगामी निवडणुकांच्या काळात येईलच! निष्ठावंत कार्यकर्त्यांची मजबूत फळी, बेरजेचे राजकारण, मोकळे व मोठे मन आणि फर्डे वक्तृत्व कौशल्य ही राजकारणात कायमच त्यांची जमेची बाजू राहिलेली आहे. त्यामुळे मुंडे यांचे मौन आता अल्पकालीन आहे, हे स्पष्ट आहे आणि त्याची प्रचिती सध्या सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात दिसून आली.

आजवर झालेले घात – आघात सहन करून त्यातून वाट काढत धनंजय मुंडे हे पुन्हा एकदा सुपारी देणाऱ्या आणि घेणाऱ्यांचे दात घशात घालून नवी उसळी घेणार आणि पूर्वीपेक्षा अधिक जोमाने, अधिक उत्साहाने राजकारणातील राजहंस बनण्याच्या मार्गावर मार्गक्रमण करणार हे निश्चित आहे.

मागील वर्षी एका भाषणात ते म्हणले होते,
कई लोगों ने कोशिश की, मुझे मिट्टी मे दबाने की,
मैं बीज हुं, आदत है मेरी, बार बार उग जाने की!

या काव्यपंक्ती प्रमाणे निश्चितच जितक्या वेळा धनंजय मुंडेंना दाबण्याचे, संपवण्याचे प्रयत्न होतील, तितक्याच ताकदीने ते पुन्हा उसळणार आणि एक लोकमान्य लोकनेतृत्व होण्याच्या दिशेने गतिमान वाटचाल करणार... हे नक्की आहे!

सन्माननीय श्री. धनंजय मुंडे यांच्या जन्मदिनाच्या निमित्ताने शब्दरूपी शुभेच्छा!

**–सुधीर सांगळे, बीड**

## पान १ वरून पुढे...

## विनायकराव मेटे...

यांच्या आठवणींना उजाळा दिला तर शिवसंग्राम अध्यक्ष डॉ. ज्योती मेटे यांचे पहिल्यांदाच आक्रमक भाषण ऐकायला मिळाले.

आपल्या पोटाची खळगी भरण्यासाठी मुंबईत मोलमजुरी करण्यासाठी बीड जिल्ह्यातून आलेले विनायकराव मेटे हे सलग पाच वेळा आमदार होतील असे स्वप्नात ही वाटत नव्हते नुसते आमदारच नाही तर त्यांनी शिवसंग्राम संघटना स्थापन करून उभ्या महाराष्ट्रात आपल्या कार्यकर्त्यांची फौज तयार केली आणि महाराष्ट्राच्या राजकारणात एक वेगळा ठसा उमटवला मराठा, धनगर , मुस्लिम आरक्षण , शिवस्मारक , आण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाची स्थापना, शेतकरी पेन्शन योजना, व्यसनमुक्ती अभियान यासारख्या अनेक गोष्टीवर काम करत असताना त्यांनी आपल्या नावाचे एक वेगळे वलय निर्माण केले होते. मराठा आरक्षणावर विधिमंडळात आणि न्यायालयात त्यांची मोठी योगदान होते. परंतु या अद्वितीय नेत्याच्या जाण्याने आज त्यांची जयंती साजरी करण्याची दुर्दैवी वेळ त्यांच्या सर्व हितचिंतकांवर आली आहे. आज आपल्या नेत्याला श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी मुंबई सह महाराष्ट्रातून असंख्य चाहत्यांनी वडाळा येथील भारतीय क्रीडा मंडळ परिसरात मोठी गर्दी केली होती.यावेळी मंचावर उपस्थित मा. आयएएस. अधिकारी श्री. निर्मलकुमार देशमुख, मुंबई महानगरपालिकेचे कार्यकारी अभियंता श्री.नवनाथ घाडगे, सेवानिवृत्त मुख्य अभियंता श्री. पी. वाय. देशमुख, जागतिक कीर्तीचे स्त्री रोग तज्ज्ञ डॉ.प्रवीण म्हात्रे ,राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे श्री. प्रमोद हिंदूराव, शिवसंग्राम प्रदेश उपाध्यक्ष श्री. प्रभाकर कोलंगडे ,शेखर पवार, मीरा–भाईंदरचे नगरसेवक श्री.अनिल भोसले,श्री. संजय सिंघन आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक शिवसंग्रामचे ज्येष्ठ नेते नारायणराव काशीद यांनी केले तर आभार प्रदर्शन योगेश विचारे यांनी केले. मुंबई शिवसंग्रामच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या अभिवादन कार्यक्रमास नेहमी शांत आणि संयमी पहावयास मिळालेल्या शिवसंग्राम अध्यक्ष डॉ. ज्योती मेटे कमालीच्या आक्रमक पहावयास मिळाल्या लोकनेते विनायकराव मेटे यांच्या आठवणींना उजाळा देत असतानाच त्यांनी शिवसंग्रामच्या मावळ्यांना खचून न जाता धैर्याने लढा असा संदेश दिला त्याचबरोबर जर कोणाला निष्ठा काय चीज असते ती पाहायच असेल तर त्यांनी मेटे साहेबांची शिवसंग्रामला पाहायला हवी या निष्ठे बद्दल आणि माझ्यावर विश्वास ठेवल्या बद्दल मी तुम्हला सर्वाना सलाम करते. आणि याच निष्ठावंत कार्यकर्त्यांना जपण्यासाठी आज गतवर्षीप्रमाणेच यावर्षी देखील आपण शिवसंग्रामच्या सर्व कार्यकर्ते पदाधिकारी यांचा विमा उतरवला आहे. मेटे साहेबांच्या आरक्षण लढ्यात मी त्यांची साक्षीदार राहिली आहे. आरक्षणविषयक कायदेशीर बाबींवर नेहमी त्यांच्याशी चर्चा व्हायची मराठा आरक्षण न्यायालय त्यांचे मोठे योगदान होते आणि ज्या ज्या वेळी मेटे साहेबांना मदत लागायची त्यावेळी पडद्यामागून मी त्यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभी असायचे मेटे साहेब काम करताना त्यांचा वैयक्तिक हेतू काही नव्हता ज्या जातीत जन्मलो त्याला न्याय देण हे त्यांचे काम होत. मराठा आरक्षणावर बोलताना अनेकजण मेटे साहेबांच नाव टाळयचे फोटो येऊ द्यायचे नाहीत याने त्यांना काय सिद्ध करायचं आहे? असा सवालही त्यांनी यावेळी विचारला साहेबांचा वसा आणि वारसा आपण पुढे घेऊन जातोय हे आपण ठामपणे सांगू शकतो.

## काळ्या बाजारात...

एच. ४४ यू २२५७) दिसून आला. पोलिसांना संशयास्पद वाटल्याने त्याचा पाठलाग केला. तेव्हा धारूरमधील एका धान्याच्या दुकानासमोर टेम्पो उभा दिसून आला. यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक देविदास वाघमोडे, पोलीस जमादार अशोक गवळी, पोलीस जमादार विष्णू वायबसे, हेड कॉन्स्टेबल जमीर शेख, यांनी चौकशी केली असताना चालकाने त्याचे नाव इब्राहिम खाजा (रा.धारुर) असे सांगितले. पोलिसांनी त्याच्याकडे केलेल्या चौकशीत धान्याच्या कसल्याही पावत्या आढळून आल्या नाहीत, तसेच सदरील धान्य राशनचे असल्याचा संशय आल्यावरून पंचनामा केला. यावेळी वाहन चालकाने होळ येथील राशन दुकानदार अशोक तुकाराम घुगे याच्याकडून माल घेऊन धारूरच्या मोंढ्यात विक्रीसाठी देत असल्याची कबुली पंचनाम्यात दिली. पुरवठा विभागाकडे नोंदीनुसार, अशोक घुगे याचे राशन दुकान कोलंबस सहकारी संस्था अंतर्गत होळ येथे कार्यरत आहे. दरम्यान, सहाय्यक पोलीस निरीक्षक देविदास वाघमोडे यांच्या उपस्थितीत केलेल्या पाहणीत अंदाजे ४० ते ५० गोण्या गहू आढळून आला असून सुमारे २५ क्विंटलहून अधिक धान्य असल्याची माहिती आहे. पुढील कार्यवाहीसाठी पुरवठा विभागाला अहवाल दिला जाणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

## 'जनसुरक्षा नव्हे...

शेख युनुस, सुदाम तांदळे, शिवशर्मा शेलार, शेख मुबीन, शेख मुस्ताक कॉम्रेड.नामदेव चव्हाण, आयटक नेते,माजी सैनिक अशोक येडे बीड जिल्हाध्यक्ष (आप), रामधन जमाले बीड जिल्हाध्यक्ष (इंटक), डी .जी. तांदळे अध्यक्ष किसानसभा महाराष्ट्र राज्य, कॉम्रेड ज्योतीराम हुरकुडे , कॉम्रेड भाऊराव प्रभाळे ,बीड जिल्हा सचिव भारतीय कम्युनिस्ट पक्ष, जगन्नाथ बहीर, मराठवाडा शिक्षक नेते, कॉम्रेड बी.एस. दहिवडे, सखाराम बेगडे बीड जिल्हा सचिव (इंटक), कॉम्रेड. व्ही.एन.सवासे आदी सहभागी होते. डॉ. ढवळे म्हणाले की, हे विधेयक राजकीय हेतूने प्रेरित असून सरकारला जाब विचारणाऱ्या कार्यकर्ते, पत्रकार व संघटनांचे तोंड बंद करण्याचे साधन आहे. संशयावरून कोणालाही अटक, संघटना बेकायदेशीर ठरवणे, मालमत्ता जप्ती, बँक खाती गोठवणे यांसारख्या अमर्याद अधिकारांची तरतूद या विधेयकात आहे.

## राईकरांसाठी दर...

नगरपालिकेत आढावा बैठक आयोजित करून शहरातील नागरिकांच्या अडचणी समजुन घेत अडचणी मार्गी लावण्यासाठी नगरपालिकेला सुचना केली. यावेळेस शहरातील नागरिकांनी उपस्थित रहावुन पंतप्रधान आवास घरकुल योजनेंतर्गत लाभार्थ्यांना पहिला हाप्ता तर काहीना दुसरा हाप्ता मिळालेला नाही. अशा तक्रारी नागरिकांनी करून, आपले गाऱ्हाणे बाळराजे पवार यांच्याकडे माडले. गेली महिन्या पासून शहरातील नाली सफाई झालेली नाही. अनेक ठिकाणी कचरा डेपो साचलेले फोटो दाखवत नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे. पंतप्रधान आवास घरकुल योजनेंतर्गत नवाऱ्ये ऑनलाईन केलेले आहेत त्या संदर्भात अजुन नविन लोकांची यादी जाहीर झालेली नाही. अशा तक्रारारी नागरिकांनी लोकनेते बाळराजे पवार यांच्याकडे नागरीकांनी केल्या आहेत. यावेळी मुख्याधिकारी विक्रम मांडुरके, शिवराज पवार, मा.नगराध्यक्ष सुशील जंवजाळ, ब्रम्हदेव धुरंधरे,मा.उपनगराध्यक्ष राजेंद्र राक्षसभुवनकर,सभापती राहुल खंडागळे,भगवान घुबार्डे,जानमहमंद बागवान, याहीया खॉन, दादासाहेब गिरी,मधुकर वादे, प्रमोद मोटे, गणेश मोटे,मा.नगरसेवक आप्पासाहेब कानुडे, राम पवार, संजय इंगळे, मुन्ना सेट, कृष्णा काकडे, राजेंद्र आर्दड, धम्मपाल सौदरमल, बद्दोदिन, छगन आप्पा हादगुले, किशोर धोडलकर,अरुण मस्के, भरत गायकवाड, सय्यद आय्युबभाई, सय्यद एजाज, शिनुभाऊ बेद्रे, आदी उपस्थित होते. दरम्यान,

## लोकजागृती आणि...

बाहेर देखील मोठ्या प्रमाणात काम उभे करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. शेतकरी आणि कामगारांच्या मुद्द्या बरोबरच लोकजागृतीच्या मुद्द्यावर देखील त्यांनी आपले मत स्पष्ट केले.

शिक्षण व्यवस्थेमध्ये गाव पातळी करून पासून सुधारणा व्हावी, म्हणून शाळांकडे लक्ष केंद्रित करून विद्यार्थ्यांना मूलभूत सुविधा गावातच मिळून देण्यासाठी सक्रिय राहावे लागेल, असे प्रतिपादन परिषदेचे सचिव तुषार पाटील यांनी केले. तर सर्वच काम करत असताना कार्यकर्त्यांनी दक्ष राहून शक्य तेवढा वेळ देऊन काम करण्याची गरज असल्याचे परिषदेचे विश्वस्त गोवर्धन मस्के आणि विष्णू ढवळे यांनी म्हटले. मा. अण्णा हजारे यांनी परिषदेला दिलेला शुभेच्छा संदेश गोवर्धन मस्के यांनी वाचून दाखवला.

## पान ४ वरून पुढे...

## राज्य सेवा...

कर्मचारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी श्री. जॉन्सन यांनी विविध विभागांद्वारे निपटारा झालेली प्रकरणे आणि प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेतला. तसेच सर्व कार्यालयाच्या सूचना फलकावर महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ प्रसिद्ध करण्यात यावा. पोर्टलवरील प्राप्त तक्रारी विहित वेळेत निकाली काढाव्यात. प्रलंबित तक्रारीचा व निकाली काढलेल्या तक्रारींचा अहवाल कार्यालय प्रमुखांनी वेळोवेळी जिल्हाधिकारी कार्यालयास वेळेत सादर करावा, अशा सूचनाही कार्यालय प्रमुखांना जिल्हाधिकारी जॉन्सन यांनी केल्या.

## अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर...

कर्मचाऱ्यांच्या जबाबदारी निर्ववहनात अडथळा आणणे, हिंसक कृत्य करणे वा हिंसाचारास उत्तेजन देणे, जनतेच्या मनात दहशत निर्माण होईल असे कृत्य करणे ,आज्ञाभंग वा कायदे भंगास उत्तेजन व हे सर्व करण्यासाठी निधी वा सामग्री जमा करणे इत्यादींचा जन सुरक्षा कायद्यात उल्लेख असून सत्ताधारी पक्ष याचा गैरवापर करण्याची दाट शक्यता असल्याने हे जन सुरक्षा नव्हे तर जनमुस्कटदाबी विधेयक तातडीने रद्द करण्यात यावे अशी मागणी बीड जिल्हा सामाजिक कार्यकर्ता संघटनेच्या वतीने जिल्हाध्यक्ष डॉ. संजय तांदळे यांनी दि. १४ जुलै २०२५ सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत मुख्यमंत्र्यांना पाठवलेल्या निवेदनाद्वारे केली आहे .यावेळी सुदाम कोळेकर डॉ. लक्ष्मण पवळ आदींची उपस्थिती होती.

## धनंजय मुंडे...

रक्तदात्यांनी यावेळी रक्तदान केलं आहे, या कार्यक्रमास विविध सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील मान्यवर, राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी आणि युवकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

## दलीत, भुमीहीन...

आजतागायत वहिती असलेली सर्व गायरान जमिनी कास्तकरांच्या नावे कराव्यात या जमीनीवर शासनाकडून उभे केले जात असलेले सर्व प्रकल्प रोखावे, ऊसतोड कामगारना माथाडी कामगार कायद्यांच्या अंतर्गत असलेल्या सर्व तरतूदी लागू करुन या मजुरांना विम्याचे संरक्षण लागु करावे, वयोवृद्धांना संजय गांधी निराधार व इंदिरा गांधी निराधार योजनेत प्रतिमहा ६हजार रु मासिक अर्थसहाय्य लागु करा, बेघर कूटुबांसाठी घरकुल योजनेसाठी ५लाख रु अशी आर्थिक तरतूद करावी. मागास वर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीत वाढ करुन ती वेळेवर मिळावी,अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, वसंतराव नाईक महामंडळ, महात्मा फुले विकास महामंडळ , मौलाना आझाद विकास महामंडळ यांना भरीव निधी देण्यात यावा, आर्टी, बार्टी या संस्था ना भरीव निधी उपलब्ध करावा गाव तिथे दलितांना पक्की स्मशान भुमी असावी या मागण्यांचा समावेश आहे. या मोर्चास महाराष्ट्राचे कार्याध्यक्ष मच्छिंद्र गवारे यांचे सह धोंडीराम पाटोळे, राधिका चिंचोलीकर, मधुकर कांबळे, विष्णु मुजमुले, महादेव उमाप, बंडु लोखंडे, धोंडीराम हातागळे, रघूनाथ कसबे, अमरजित मुजमले यांनी मार्गदर्शन केले, मोर्चाचे सूत्रसंचालन बाबासाहेब थोरात यांनी केले तर आभार शहराध्यक्ष संदीप वाघमारे यांनी केले या मोर्चात महिला, पुरुष, तरुण मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## दुधाची उधारी...

त्यानंतर मी त्यास म्हणाले की तुमच्या दुधाचे पैसे आमचे मालक आल्यावर देऊ असे असे म्हणतात अशोक गरजे यांनी मला दुधाचे पैसे दे असे म्हणून शिवीगाळ करून पूजे पायाच्या करंगळीवर दगड मारला त्यानंतर माझ्या घराजवळ राहणारी लक्ष्मी बगाडे व जया दादा मोरे व जानवी दादा मोरे ह्या तिथे आल्या सदर अशोक यांनी कमरेवर लाथा मारल्या लाथ आणि मारहाण केली व डोक्याचे केस धरून ओढले व आम्हा सर्वांना मनाला की मग त्यांना व आम्हाला सर्वांना जातीवाचक शिवीगाळ केली याबद्दल फिर्यादीने पोलीस स्टेशन पाटोदा येथील सर फिर्याद दाखल केली पूर्ण प्यार सदर फिर्यादीप्रमाणे गुन्हा आरोपीच्या विरुद्ध गुन्हा नोंदवून घेऊन त्याचा तपास तत्कालीन पोलीस उपाधीक्षक धाराशिवकर यांच्याकडे वर्ग करण्यात आला. असे मत करसहफिर्यादी व जया दादा मोरे राहणार तेलंगशी तालुका जामखेड व लक्ष्मी हनुमंत बगाडे राहणार पाटोदा ह्या एका टोळीत असूनआपापल्या कोप्या जवळ रहात होत्या . त्यावेळी आरोपी अशोक दुधाचे .पैसे मागण्या साठी दारू पिउन आमच्या कोण्या जवळ फिर्यादी कडे आला व त्याने दुधाचे पैश्याची मागणी केली त्यावेळी फिर्यादी त्याला म्हणाली मालक आल्यावर देवुत . त्यावेळीआरोपी अशोक रामराव गर्जे यांचे विरुद्ध फिर्यादीने फिर्याद दिली होती आरोपी हा आमच्या कोप्या जवळ दारू पिऊन आला व त्याने दुधाचे पैसे मागितले त्यावेळी फिर्यादी पैसे मालक आल्यानंतर देऊ असे म्हणाली त्यामुळे आरोपीने फिर्यादीला अश्लील शिवीगाळ करून तिचे उजवे पायाच्या करंगळीवर दगड मारला ,त्यावेळी फिर्यादीचे कोपी शेजारी कोपी असलेली लक्ष्मी बगाडे व जया दादा मोरे व त्यांची मुलगी जानवी दादा मोरे तिथे आल्या व आरोपीने त्यांच्या डोक्याचे केस धरून ओढले, लाथाबुक यांनी महाराज केली व जातीवाचक शिवीगाळ करून दुधाचे पैसे देता येत नसतील तर कशाला धंदा करता असे आरोपीने म्हणाल्याने ते सांगून त्याचे विरुद्ध आय पी सी चे कलम ३२३ २९४ ५०४ ३(।) ,सीआरपीसी चे कलम ३ (२) नुसार गुन्हा दाखल केला या गुणाची चौकशी करून पोलीस उपाधीक्षक धाराशिवकर यांची यांनी चौकशी करून आरोपी विरुद्ध आरोप पत्र दाखल केले ३२४,३२३ २९४ कायदा चे कलम 3(1) (r) (s) व ( 2)( va) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्या केसची सुनावणी अप्पर जिल्हा व सत्र न्यायाधीश साहेब श्री पाटवदकर साहेब यांचे समोर झाली सदर केस मध्ये फिर्यादी व पाच साक्षीदार तपासले तथापी सुनावणी नंतर आरोपी अशोक गर्जे राहणार महासांगवी ता पाटोदा जी बीड यांची जातिवाचक गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता करण्यात आली या केस मध्ये आरोपीतर्फे ॲड संगीता क्षीरसागर (धसे )यांनी परिश्रम घेतले व त्यांना ॲड देशपांडे आणि ॲड सय्यद यांनी सहकार्य केले

## साहित्यरत्न अण्णाभाऊ...

माजलगाव शहरातून भव्य दिव्य मिरवणूक काढण्यात येणार असून महापुरूषांच्या गायनाचा कार्यक्रम व व्याख्यानासह इतरही विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार असल्याचे कमिटीच्या वतीने कळवण्यात आले आहे. प्रसंगी विराज आठवे, अजय साळवे, सुमित मोरे, आदेश शिरसागर, सिद्धांत सुरवसे, अभिषेक चौरे यांच्या सह सम्राट अशोक नगरातील जेष्ठ नागरिक तथा युवकांची उपस्थिती होती.

## राज्यस्तरीय सामन्यांसाठी....

मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर मिळवलेले हे यश विद्यार्थ्यांसाठी एक प्रेरणास्त्रोत ठरणार आहे. त्यांच्या कार्याचे अभिनंदन होत असून व पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात येत आहेत

## देवगिरी अर्बन...

ऑपरेशन चा खर्च सुद्धा संस्थेच्या वतीने करण्यात आला. संस्था पुरवत असलेल्या अचूक, जलद, सर्वोत्तम व सुरक्षित बँकिंग सेवेमुळे आज संस्था हजारो सभासदांच्या मनात घर करून आहे.

## लिंबागणेश येथे...

त्या पार्श्वभूमीवर हभप कीर्तन, हरिपाठ, गजर, आरती अशा धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन होणार आहे. संपूर्ण गावात या उपक्रमामुळे भक्तिभाव आणि उत्साहाचे वातावरण आहे. ध्वजाच्या स्थापनेने गावाला मिळणार नवी ओळख– हा भगवा ध्वज केवळ उंचीने नव्हे, तर भाविकांच्या मनात श्रद्धा, गौरव आणि हिंदुत्वाची जाणीव जागृत करणारा ठरणार आहे. लिंबागणेश गावाच्या धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक प्रगतीचे प्रतीक म्हणून हा ऐतिहासिक उपक्रम कायम लक्षात राहील, यात शंका नाही.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# बीड जिल्ह्यातील हजारो रजिस्ट्री होण्याचे मार्ग मोकळे!

# तुकडे बंदी कायदा रद्द; एक गुंठ्याचेही होणार दस्त

## जानेवारी २०२५ पर्यंतचे एक, दोन, तीन गुंठ्यांच्या भूखंडाची खरेदी, विक्री कायदेशीर होणार

**बीड । प्रतिनिधी**

तुकडे बंदी कायद्यामुळे बीड जिल्ह्यातील हजारो दस्त चे व्यवहार अडकले होते आणि त्यांनी छोट्या घराचे स्वप्न पाहून एक दोन गुंठे जमीन घेतली मात्र ती कायद्याच्या चौकटीत सापडल्याने रजिस्ट्री होत नसल्याने अनेकांना आर्थिक व मानसिक त्रासाला सामोरे जावे लागले होते. तुकडे बंदी कायदा संदर्भात सरकार मोठा निर्णय घेणार असल्याची चर्चा होती. या संदर्भात महाराष्ट्र शासनाकडून राज्यात तुकडे बंदी कायदा रद्द करण्यात आला आहे. यामुळे बीड जिल्ह्यात अडकलेले हजारो व्यवहार होणार असल्याने एकीकडे बांधकाम व्यवसायिकांम धून समाधान व्यक्त करण्यात येत आहे तर दुसरीकडे आपले छोटेसे टुमदार घर असावे ही सर्व सामान्य व्यक्तीची इच्छा पूर्ण होण्याच्या मार्गावर आहे. एक किंवा दोन गुंठे घेत या ठिकाणी घर बांधणे आता सोपे होणार आहे शासनाच्या जीआर नुसार येत्या पंधरा दिवसात राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात त महसूल विभागाला याबाबत सूचना देण्यात येणार असून एक जानेवारी २०२५ पर्यंतचे सर्व तुकडे करून भूखंड विक्री खरेदी प्रकरण कायदेशीर होणार आहेत.



बागायत जमीन दहा गुंठे आणि जिरायत जमिनीचे २० गुंठ्यांच्या खालील क्षेत्राची खरेदी, विक्रीच्या व्यवहारांवर बंदीचा कायदा रद्द करण्यात आला आहे. पंधरा दिवसांत जिल्हा पातळीवर मिळाल्यानंतर प्रत्यक्ष कार्यवाहीला सुरुवात होईल.यापुढील काळात कमी क्षेत्रातील भूखंडाची खरेदी, विक्री कायदेशीरदृष्ट्या पात्र होणार आहेत, असे महसूल, मुद्रांक विभाग प्रशासनाकडून सांगण्यात आले. तुकड्यांची शेती परवडत नाही. अपेक्षित उत्पादन मिळत नाही. म्हणून शासनाने तुकडेबंदीचा कायदा आणला. पण, शहरालगत नागरीकरण गतीने होत आहे. खेड्यांमध्येही गावठाणबाहेर बांधकामे होत आहेत. यासाठी जमिनीच्या छोट्या भूखंडाची खरेदी, विक्रीचे व्यवहार वाढले.पैशाच्या गरजेपोटी अनेकजण एक, दोन, तीन, पाच गुंठ्यांचे भूखंडही विकले. अनेकांनी भविष्यात घर बांधता येईल, म्हणून घेतलेही. मात्र, तुकडेबंदी कायद्यामुळे व्यवहार कायदेशीर झाले नाहीत.

करार पत्रावरील व्यवहारात कायदेशीर मालकीचे प्रश्न उपस्थित झाल्याने वाद न्यायालयात जाऊ लागले. अशा भूखंडावर घर बांधण्यासाठी राष्ट्रीयीकृत बँकांचे कर्ज मिळत नाही. बांधकाम परवाना मिळत नाही. म्हणून तुकडे बंदीचा कायदा रद्द करावा, अशी मागणी विधानसभेत आमदारांनी केली. त्यानंतर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी तुकडेबंदीचा कायदा रद्द केला. यामुळे १ जानेवारी २०२५ पर्यंत झालेल्या व्यवहारांचे नियमितीकरण केले जाणार आहे. त्याचा लाभ जिल्ह्यात किती जणांना होणार याची माहिती संकलित करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. पंधरा दिवसांनंतर या कामाला गती येणार आहे. महापालिका, नगरपालिका कार्य क्षेत्राजवळील क्षेत्रतुकडे बंदीतून महापालिका, नगरपालिका, नगरपंचायत, विकास प्राधिकरणालगतच्या क्षेत्रातील आणि गावठाणजवळील २०० ते ५०० मीटरपर्यंतचा भाग वगळण्यात आला आहे.

भूखंड पाडून विकण्याचा ट्रेंड वाढणारतुकडेबंदी रद्द झाल्याने जमिनीचे तुकडे करून म्हणजे भूखंड पाडून विकण्याचा ट्रेंड वाढेल. यातून बांधकाम व्यवसायाला आणखी बुस्ट मिळेल, असेही काही बांधकाम व्यावसायिकांचे म्हणणे आहे.

### ● बांधकाम व्यवसायिक व शेतकऱ्यांना लाभ

**तुकडे बंदी कायद्यामुळे सर्वात जास्त फटका बांधकाम व्यवसायिकांना व शेतकऱ्यांना बसला होता तुकडे पाडून खरेदी वक्री व्यवहार कायदेशीर होत नसल्याने अनेकांना अडचणीचा सामना करावा लागत होता. बांधकाम करण्यासाठी गुंठेवारी होत नसल्याने अनेकांचे व्यवहार ठप्प झाले होते यामुळे बांधकाम व्यवसायिकासह शेतकऱ्यांनाही आर्थिक फटका बसला होता. मात्र सरकारने तुकडे बंदी कायदा रद्द केल्याने आता एक दोन गुंठ्याचे व्यवहारही कायदेशीर होणार असल्याने याचा फायदा बांधकाम व्यवसायिक व शेतकऱ्यांना होणार आहे.**

# ‘विकसित महाराष्ट्र 2047’ जनसहभागासाठी राज्य शासनाचे विशेष अभियान

**मुंबई । प्रतिनिधी**

विकसित महाराष्ट्राच्या संकल्पनेमध्ये योगदान देण्यासाठी https://wa.link/o93s9m किंवा https://vikasitmaharashtra.civis.vote/consultations/1245 या लिंकवर यावर आपले मत दि.१७ जुलै २०२५ पर्यंत नोंदवावे, असे आवाहन मुंबई उपनगर जिल्हाधकारी प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे.

राज्याच्या ध्येयाची पूर्तता करण्याच्या दृष्टीने तसेच प्रत्येक क्षेत्राचा ठसा राज्याच्या अर्थव्यवस्थेवर उमटावा, यासाठी विकसित महाराष्ट्र २०४७ चे व्हिजन जाहीर करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. महाराष्ट्राला २०४७ पर्यंत विकसित राज्यांच्या अग्रक्रमात नेण्यासाठी राज्य शासनाने विकसित महाराष्ट्र २०४७ हे दीर्घकालीन (Vision Document) तयार करण्याचा संकल्प केला आहे. १६ संकल्पनांवर आधारिक क्षेत्रनिहाय गट करण्यात आले आहेत. व्हिजन डॉक्युमेंटचा आराखडा तयार करण्यासाठी कृषी, शिक्षण, आरोग्य, ग्रामविकास, नगरविकास, भूसंपदा, जलसंपदा, पायाभूत सुविधा, वित्त, उद्योग, सेवा, सामाजिक विकास, सुरक्षा, सॉप्ट पॉवर, तंत्रक्षान व मानव विकास, मनुष्यबळ व्यवस्थापन असे क्षेत्रनिहाय गट असतील. या सर्व गटांनी प्रगतिशील, शाश्वत, सर्वसमावेशक व सुशासन यावर आधारित आराखडा तयार करावयाचा आहे. आराखडा तयार करताना त्या-त्या क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्ती, शासकीय संस्थांशी सल्लामसलत करण्यात येणार आहे. या अभियानात सामान्य जनतेचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करण्यासाठी शासनाने विविध उपक्रम हाती घेतले आहेत.

या उपक्रमाअंतर्गत शासकीय योजना फक्त सरकारी कागदांपुरती मर्यादित नसून, प्रत्येक नागरिकाचे स्वप्न आणि अपेक्षा यात सामावून घ्याव्यात, हाच शासनाचा उद्देश आहे. जिल्ह्यातील नागरिकांच्या विकसित महाराष्ट्र २०४७ संदर्भातील मते, अपेक्षा, अभिप्राय, आकांक्षा व प्राथम्यक्रम जाणून घेण्यासाठी जिल्हास्तरीय सर्वेक्षण अभियान राबविण्यात येत आहे. शासनाने नागरिकांना त्यांच्या मतांचा सक्रिय सहभाग देण्यासाठी डिजिटल माध्यमांचा प्रभावी वापर सुरू केला आहे. सर्वेक्षणासाठी नागरिकांनी https://wa.link/o93s9m किंवा https://vikasitmaharashtra.civis.vote/consultations/1245 या लिंकवर यावर आपले मत दि. १७ जुलै २०२५ पर्यन्त नोंदवून विकसित महाराष्ट्रच्या संकल्पनेमध्ये योगदान द्यावे, असे आवाहन मुंबई उपनगर जिल्हाधकारी प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे.

# स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुक तयारीचा विभागीय आयुक्तांकडून आढावा

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी छत्रपती संभाजीनगर विभागातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक तयारीचा जिल्हानिहाय आढावा घेतला. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीत मतदान केंद्राची संख्या निश्चित करताना काळजीपूर्वक निश्चित करा, असे निर्देश त्यांनी दिले.



विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित बैठकीला अपर आयुक्त डॉ. अनंत गव्हाणे, नगरविकास विभागाचे सह आयुक्त देविदास टेकाळे, सहायक आयुक्त संजय केदार तसेच दुरदृश्य प्रणालीद्वारे विभागातील सर्व जिल्हाधिकारी तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यासह नगरप्रशासन विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

बैठकीदरम्यान विभागीय आयुक्त श्री पापळकर यांनी जिल्हानिहाय स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक तयारीबाबत माहिती जाणून घेतली. मतदार संख्या, इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीन (ईव्हीएम), मतदान केंद्रांची व्यवस्था आणि इतर अनुषंगिक तयारी मतदान केंद्रांची रचना आणि निवडणूक प्रक्रियेच्या तयारी, मतदान केंद्रांवर पाणी, वीज, स्वच्छतागृहे यासारख्या मूलभूत सुविधा, ईव्हीएम सुरक्षितता आदी तयारीचा आढावा घेत जिल्हाधिकारी व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी एकत्रित व्यवस्थेची पाहणी करावी, असे निर्देश त्यांनी दिले. यावेळी सबंधित विभागाचे अधिकारीही उपस्थित होते.

# महाराष्ट्रातील 'या' हिल स्टेशनवर अचानक लाखो पर्यटकांची गर्दी झाली; वाहनांची १० KM लांब रांग; अन्न, पाणी मिळेना...

**अमरावती । प्रतिनिधी**

लोणावळा, खंडाळा, माथेरान, महाबळेश्वर ही महाराष्ट्रातील सर्वात लोकप्रिय पर्यटनस्थळ आहेत. येथे पर्यटकांची नेहमीच गर्दी असते. अशातच आता महाराष्ट्रातील आणखी एक पर्यटनस्थळ गर्दीमुळे चर्चेत आले आहे. महाराष्ट्रातील अमरावती जिल्ह्यातील चिखलदरा हे हिल स्टेशन पावसाळ्यात हिरवळ आणि पांढऱ्या धुक्याने वेढलेले आहे. त्यामुळे गेल्या आठवड्याच्या शेवटी येथे मोठी गर्दी झाली होती. शुक्रवार ते रविवार दरम्यान सुमारे एक लाख




पर्यटक येथे आले होते. ज्यामुळे संपूर्ण परिसरात वाहतूक कोंडी झाली होती. रविवारी परिस्थिती आणखी बिकट झाली, जेव्हा परतवाडा ते चिखलदरा पर्यंत सुमारे १० किमी लांब वाहनांच्या रांगा लागल्या. परिस्थिती अशी होती की शेकडो पर्यटक त्यांच्या वाहनांमधून न उतरता परतले.

विदर्भाचे नंदनवन समजल्या जाणाऱ्या व चारही बाजूंनी हिरवेगार जंगल, खोल दरी आणि उंच पहाड हे चिखलदराचे अतिशय सुंदर दृश्य पक्ष्याप्रमाणे आता पर्यटकांना जमिनीपासून ३ हजार फूट उंच आकाशातून पाहण्याचा आनंद घेता येणार आहे. चिखलदराचे हे दृश्य पर्यटकांना अनुभवण्यासाठी पॅरोमोटरिंगची सुविधा करण्यात आली आहे. खोल दरीमध्ये उतरणे आणि डोंगरातील ट्रेकिंगचा थरारक अनुभव घेण्यासाठी साहसी पर्यटक नियमित चिखलदरासह मेळघाट्यात येत आहेत. त्यामुळे पॅरोमोटरिंगमुळे आता साहसी पर्यटकांना भिमकुंड येथील खोलदरीत, गाविलगड किल्ला, स्कायवाक पॉईंट, चिखलदरा शहर आणि येथील जंगल उंच आकाशातून पाहण्याची मजा लुटता आहे. वन विभागामार्फत ही सुविधा करण्यात आली आहे. तसेच महाभारतात उल्लेख असलेल्या भीम कुंड धबधब्याच्या वरून सायकलिंग करण्याचा थरार पर्यटक अनुभवत आहे. हा धबधबा जमिनीपासून ३५०० फूट आहे त्यामुळे पर्यटक या धबधब्याच्या वरून सायकलिंग करत आहे.

दरम्यान सध्या चिखलदऱ्यात अल्हाददायक वातावरण निर्माण झाल्याने पर्यटकांनी तोबा गर्दी केली आहे. धामणगाव गढीहून चिखलदरा येथे जाण्यासाठी आणि येण्यासाठी घाटंग मार्ग निश्चित करण्यात आला होता. परंतु लाखोंच्या गर्दीसमोर ही योजना पूर्णपणे अपयशी ठरली. शनिवारी रात्रीपासून ते रविवारी संध्याकाळपर्यंत परतवाडा, मोठा, नगर परिषद नाका आणि धामणगाव गढी रस्त्यावर वाहनांच्या रांगा लागल्याचे दिसून आले.

# विद्यार्थ्यांची सुरक्षा रामभरोसे! ना दरवाजे, ना अटेंडंट, ना सुरक्षा, मालवाहू टेम्पोतून विद्यार्थी शाळेत

**मुंबई । प्रतिनिधी**



सध्या एक व्हिडिओ व्हायरल होतोय. तो कुठल्या खेडेगावातला नाही.. तर मुंबई उपनगराला जोडून असलेल्या शहरातला आहे यावर तुमचा विश्वास बसणार नाही.. कल्याणमध्ये शालेय विद्यार्थी बस नाही, रिक्षा नाही तर चक्क मालवाहू टेम्पोतून ये जा करतात. ना कुठली सुरक्षेची काळजी, ना सोय... पाहुयात.. विद्यार्थ्यांची सुरक्षा रामभरोसे कशी सुरू आहे.

मालवाहू टेम्पोतून विद्यार्थी शाळेत पोहोचले आहेत. इतकंच नव्हे तर यावर आरटीओ आणि वाहतूक पोलिसांनी डोळेझाकपणा केला आहे. हे विद्यार्थी देशाचं उद्याचं भविष्य. पण त्याचं वर्तमान नव्हे जीव धोक्यात आहे. प्रवासासाठी अनेक साधनं सध्या उपलब्ध असतानाही त्या विद्यार्थ्यांना शाळा गाठण्यासाठी मालवाहू टेम्पोतून प्रवास करावा लागतोय. कल्याणमधला हा व्हिडिओ आहे. या टेम्पोला ना दरवाजे, लक्ष ठेवायला ना एखादी मोठी व्यक्ती, ना सुरक्षेची काळजी. लोखंडी पट्ट्यांना धरून हे छोटे विद्यार्थी प्रवास करतात. बरं त्यांच्या पालकांनाही आपल्या मुलांची चिंता नाही, हे तर दिसतंय. अहो पण एरव्ही वाहतुकीचे नियम पाळावेत म्हणून कर्तव्यावर असलेल्या वाहतूक पोलिसांनाही हे दृश्य दिसू नये. उपप्रादेशिक विभाग अर्थात आरटीओचे अधिकारीही याकडे डोळेझाकपणा करत आहेत. कारण कार्यालयाच्या ५ किमी अंतरावरच नियम धाब्यावर बसवले जातायत. कारवाईचं म्हणाल तर ती केवळ नोटीस बजावण्यापुरतीच. ज्या शाळेतले ते विद्यार्थी होते त्यांच्या मुख्याध्यापकांशीही प्रतिक्रिया जाणून घेतली तेव्हा त्यांनी आम्ही पालकांना समजावलं, असंही ते म्हणाले. तर काही पालकांनीही यावर चिंता व्यक्त केलीय. आरटीओ अधिका-यांनी याबाबत आवाहन केलंय.

# बालगृहातील अनुचित प्रकार रोखण्यासाठी शासनाचे विशेष प्रयत्न : उपसभापती डॉ. गोऱ्हे

**मुंबई । प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगर येथील विद्यादीप बालगृहात घडलेल्या अनुचित प्रकाराच्या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्व बालगृहांमध्ये अतिदक्षता बाळगून भविष्यात असे प्रकार टाळण्यासाठी विशेष यंत्रणा राबविण्याच्या दृष्टीने शासन कार्यरत असल्याची माहिती विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी आज विधानभवन येथे झालेल्या बैठकीत दिली.

या बैठकीत महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, आमदार चित्रा वाघ, श्रीकांत भारतीय, प्रज्ञा सातव, आयुक्त नयना गुंडे, सहायुक्त राहुल मोरे आदींसह



संबंधित अधिकारी उपस्थित होते.

उपसभापती डॉ. गोऱ्हे म्हणाल्या की, अनुचित प्रकार टाळण्यासाठी प्रभावी धोरण तयार करणे आवश्यक आहे. मुलींचा शैक्षणिक दर्जा, कौशल्यविकास आणि जीवनमूल्ये वाढवण्यासाठी विशेष कार्यक्रम राबविणे गरजेचे आहे. बालगृहास प्रत्यक्ष भेटी देऊन तसेच लोकप्रतिनिधी आणि विभागामध्ये चर्चा करून यासंदर्भात कार्यवाही करणे गरजेचे असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.

मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, छत्रपती संभाजीनगरच्या विद्यादीप बालगृहाची नोंदणी रद्द करण्यात आली आहे. बालगृहातील मुलींच्या समस्या समजून घेण्यासाठी व उपाययोजना करण्यासंदर्भात कार्यवाही सुरू आहे. राज्यातील सर्व बालगृहे नोंदणीकृत आहेत का, हे पाहण्यासाठी गुगल मॅपिंगद्वारे सर्वेक्षण सुरू आहे. आदिवासी विकास, सामाजिक विकास आणि महिला व बालविकास या विभागांतील बालगृहांची यादी एकत्रित केली जात आहे.

महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच संकटात किंवा अन्य अडचणीत असलेल्या महिलांना सहाय्य व आधार देण्यासाठी महिला व बालविकास विभागामार्फत महिला सहाय्यता केंद्र, स्वाधारगृह योजना, उज्ज्वला योजना, सखी वन स्टॉप सेंटर योजना, बाल सुरक्षा योजना, किशोरी शक्ती योजना, पालकत्व योजना अशा विविध योजना राबविण्यात येत आहेत. तसेच महिलांसाठी हेल्पलाइन क्रमांक १८१ कार्यरत आहे.

दैनिक मराठवाडा पत्र — दि. १४/०७/२०२५

**टीसी हरवला आहे.**

**नाव वैभव राजकुमार कांबळे,**

या नावाचा १२ पास चा टीसी सांडरवण ते बीड प्रवासात हरवला आहे तरी सापडल्यास संपर्क करावा.

**संपर्क क्रमांक – ९५६१३२९७३५**

दैनिक मराठवाडा पत्र
https://marathwadapatra.com
मंगळवार, दि.१५ जुलै २०२५ पान ४

## राज्य सेवा हक्क अधिनियमांतर्गत प्रलंबित प्रकरणे निकाली काढा: जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

**बीड । प्रतिनिधी**

नागरिकांना शासकीय सेवा जलद, पारदर्शकपणे आणि कालमर्यादेत मिळण्यासाठी राज्यसेवा हक्क अधिनियम, २०१५ हा एक महत्त्वाचा कायदा आहे. या कायद्यानुसार नागरिकांना शासकीय सेवा विहित वेळेत मिळण्यासाठी सर्व विभागप्रमुखांनी त्यांच्याकडील प्रलंबित प्रकरणे विहित कालमर्यादेत तातडीने निकाली काढावेत, अशा सूचना जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी अधिकाऱ्यांना केल्या. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली राज्यसेवा हक्क अधिनियम २०१५ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आढावा बैठक जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात पार पडली. या बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, निवासी जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, अप्पर जिल्हाधिकारी हरिष धार्मिक, तहसीलदार नरेंद्र कुलकर्णी यांच्यासह सर्व संबधित विभागाचे अधिकारी व ▶▶ उर्वरित पान २ वर

# तालुक्यातील विविध मुख्यकार्यालया कडे जाणाऱ्या रस्त्याची दुरवस्था



# तालुक्याला वाली आहे का ? असा विचारला जातोय प्रश्न...

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते न्यायालया पर्यंतच्या रस्त्याची मोठी दयनीय अवस्था झालेली आहे विशेष म्हणजे याच मार्गावर विविध शासकीय कार्यालयाची मुख्यालय आहेत संबंधित रस्त्याच्या दुरुस्तीकडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे कायमच दुर्लक्ष असल्याने रस्ता खड्डेयुक्त झाला आहे तात्काळ या रस्त्याचा प्रश्न मार्गी लावण्याची मागणी परिसरातील नागरिकांमधून केली जात

किल्ले धारूर तालुका हा नेहमीच मागासलेला व ऊसतोड कामगारांचा तालुका म्हणून ओळखला जातो या तालुक्याच्या ठिकाणचे मुख्य कार्यालय असलेले तहसील कार्यालय, न्यायालय, ग्रामीण रुग्णालय,पोलीस स्टेशन, भूमी अभिलेख कार्यालय, वनविभाग कार्यालय,शासकीय आयटीआय, वस्तीग्रह यासह इतरही विविध शासकीय कार्यालय याच मार्गावर आहेत कार्यालय कर्मचाऱ्यांसाठी व या परिसरात राहणाऱ्या नागरिकांसाठी हा रस्ता अत्यंत महत्त्वाचा आहे परंतु सार्वजनिक बांधकाम विभागाच्या निष्काळशीपणामुळे या रस्त्याची चाळण झाली असल्याने या मार्गावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांना मणक्याचे आजार होऊ लागले आहेत ग्रामीण रुग्णालय याच मार्गावर असून अतिगंभीर स्वरूपाच्या रुग्णवाहिकेमधून घेऊन जाण्यास ही विलंब लागतो अशा अतिशय महत्त्वाच्या असणाऱ्या रस्त्याकडे प्रशासनाचे व लोकप्रतिनिधीचे दुर्लक्ष होत असून तालुक्याला कोणी वाली आहे का असा प्रश्न नागरिकांना पडत आहे.

## अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणणारे जनसुरक्षा विधेयक रद्द करा : डॉ. संजय तांदळे

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र सरकारने जनसुरक्षा विधेयक गुरुवारी विधानसभेत आणि शुक्रवारी वरिष्ठ सभागृह म्हणजे विधान परिषदेत आवाजी मतदानाने पारित करण्यात आले. जनसुरक्षा विधेयक सामाजिक चळवळीतील कार्यकर्ते संविधान रक्षणासाठी लढणारी मानवाधिकारी कार्यकर्ते, पत्रकार संघटना, सामाजिक कार्यकर्ते संघटना, यांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणणारे, आंदोलनाचा आवाज दाबणारे आणि लोकशाही अस्थिर करणारे




असून हुकूमशाही कडे वाटचाल करणारे राजकीय हेतूने प्रेरित राजकीय अजेंडा राबविण्यासाठी मंजूर केलेले विधेयक आहे. एकीकडे नक्षलवाद आणि दहशतवादाचा बिमोड करायचा असे सांगितले जाते. परंतु जनसुरक्षा विधेयकात कुठेही नक्षलवाद किंवा दहशतवाद हा शब्द नाही. राज्यातील नक्षलवाद संपला आहे असं सारकार म्हणत असताना मग जन सुरक्षा कायदा कोणासाठी असाही प्रश्न उपस्थित होतो. व्यक्ती वा संघटना यांनी शाब्दिक अथवा कृतीद्वारे सार्वजनिक सुरक्षा, शांतता, सौहार्द यांस धोका निर्माण करणे वा शांतता सौहार्द राखणाच्या सरकारच्या प्रयत्नात ढवळाढवळ करणे ,प्रशासनास वा सरकारी

▶▶ उर्वरित पान २ वर

## धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर संपन्न

### सिव्हील सर्जन डॉ राऊत यांच्या हस्ते शिबीराचे उद्घाटन करण्यात आले

**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते माजी मंत्री धनंजय मुंडे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त बीड शहरात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन बीड जिल्हा रुग्णालयाचे सिव्हिल सर्जन डॉ. राऊत यांच्या हस्ते संपन्न झाले. हे शिबिर मित्र नगर चौक येथील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या जिल्हा



कार्यालयात आयोजित करण्यात आले होते. विशेष म्हणजे दरवर्षी प्रमाणे धनंजय मुंडे साहेब यांच्या वाढदिवसा निमित या उपक्रमाचे यंदाचे वर्ष हे सलग नववे वर्ष ठरले असून,या शिबीराचे आयोजन राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे बीड जिल्हाध्यक्ष अजिंक्य आनेराव यांनी केले होते.या वेळी म ोठ्या संख्येने युवकांनी आणि कार्यकर्त्यांनी रक्तदान करून समाजासाठी आपल्या कर्तव्याची जाणीव व्यक्त केली रक्तदान हेच श्रेष्ठ दान या उद्दिष्टाने प्रेरित होऊन दरवर्षीप्रमाणे याही वर्षी रक्तदान शिबिर उत्साहात पार पडत ४३

▶▶ उर्वरित पान २ वर

## दलीत, भुमीहीन, कष्टकरी, कामगार, विद्यार्थ्यांच्या विविध मागण्यांसाठी मानवी हक्क अभियान चा मोर्चा



**माजलगाव । प्रतिनिधी**

दलीत, भूमिहीन, कष्टकरी कामगार, दलित विद्यार्थ्यां व निराधार व्यक्तींच्या विविध मागण्या पूर्ण कराव्यात यासाठी मानवी हक्क अभियान च्या वतिने संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा.डॉ.मिलींद आवाड यांच्या मार्गदर्शनाखाली व बीड जिल्हाअध्यक्ष राजेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली १४जुलै रोजी उपविभागीय अधिकारी कार्यालय,माजलगाव येथे मोर्चा काढण्यात आला. प्रसंगी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की,

▶▶ उर्वरित पान २ वर

## दुधाची उधारी मागितल्यामुळे केलेल्या जाती वाचक गुन्ह्यातून आरोपीची निर्दोष मुक्तता

**बीड । प्रतिनिधी**

राखी वालेकर आणि इतर दोन महिलांचे कुटुंब महासांगवी ता पाटोदा येथे ऊस तोडीसाठी आले होते . तेथे ते कोप्या बांधून राहत होते .सदर महिला आरोपी अशोक गर्जे रा. महासांगवी ता. पाटोदा याचे कडून उधारीवर दूध घेत होत्या .आरोपी अशोक रामराव गर्जे आरोपी ने उधारी चे पैसे मागितलयांच्यावर



जातीवाचक शिवीगाळ केली म्हणून सदर गुन्हा दाखल करण्यात आला होता त्यातून त्याची निर्दो ष मुक्तता करण्यात आली. या घटनेची हकीगत अशी आहे की दिनांक .१३/४/२०२२ रोजी संध्याकाळी साडेसहा वाजण्याचे सुमारास आम्ही कोप्या जवळ असताना महासांगवी येथील मठा जवळ रहणारा अशोक रामराव गर्जे रा महा सांगवी ता पाटोदा जिल्हा बिड हा दारू पिरूनव म्हणाला की आमचे दुधाचे पैसे द्या असे म्हणाला ▶▶ उर्वरित पान २

## साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे सम्राट अशोक नगर जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी संग्राम गायकवाड

**माजलगाव । प्रतिनिधी**

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीच्या निमित्ताने रविवार दिनांक १३ जुलै रोजी शहरातील सम्राट अशोक नगर येथे प्राथमिक आढावा बैठक आयोजीत करण्यात आली होती.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे जिल्हा अध्यक्ष विजयदादा साळवे यांच्या अध्यक्षतेखाली या बैठकीचे आयोजन करण्यात आले असून मार्गदर्शक म्हणून युवा नेते अमोल



भैय्या शेरकर , विवेक जाधव , सन्नी प्रधान यांची उपस्थिती होती. प्रसंगी या बैठकीत जयंती समि तीची कार्यकारणी जाहीर करण्यात आली असून जयंती समितीच्या अध्यक्षपदी संग्राम गायकवाड , उपाध्यक्षपदी गणेश गायकवाड , कोषाध्यक्षपदी विजय वैराळ तर सचिवपदी विशाल पायके यांची सर्वानुमते निवड करण्यात आली असता यंदाच्या जयंती सोहळ्यात

▶▶ उर्वरित पान २ वर

## राज्यस्तरीय सामन्यांसाठी पंच म्हणून ज्ञानदीप विद्यालयाचे क्रीडा शिक्षक मुंजाराम निरडे निवड

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य खो-खो असोसिएशन यांच्या वतीने घेण्यात आलेल्या राज्य पंच परीक्षा दिनांक २९ जून २०२५ रोजी बीड येथे पार पडली. या परीक्षेत बीड केंद्रावरून एकूण ३९ परीक्षार्थींनी सहभाग घेतला होता.या परीक्षेत ज्ञानदीप प्राथमिक विद्यालयाचे क्रीडा



शिक्षक मुंजाराम भगवान. निरडे यांनी उल्लेखनीय यश संपादन करत राज्य पंच म्हणून पात्रता मिळवली आहे. या निवडीमुळे शिक्षक मुंजाराम निरडे यांना महाराष्ट्र राज्यातील राज्यस्तरीय खो-खो सामन्यांसाठी पंच म्हणून कार्य करण्याची संधी प्राप्त झाली असून, ही बाब विद्यालयासाठी अत्यंत गौरवाची आणि प्रेरणादायी आहे. यश ही प्रेरणेची वाट असते शिस्त,

▶▶ उर्वरित पान २ वर




## देवगिरी अर्बन चे सहकार क्षेत्रात उल्लेखनीय काम




**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील सहकार क्षेत्रात विश्वासाने घेतले जाणारे नाव म्हणजेच देवगिरी अर्बन. सदरील संस्था मागील ५ वर्ष्यापासून कार्यरत आहे. संस्था भविष्याचा वेध घेत आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने अचूक, जलद, सर्वो त्तम व सुरक्षित बँकिंग सेवा प्रदान करण्यासाठी कटिबद्ध आहे. आज रोजी संस्थेने २५ कोटी व्यवसायाचा टप्पा पूर्ण केलेला आहे. सहकार क्षेत्रामध्ये केवळ आर्थिक व्यवहारा पुरतेच मर्यादित न राहता सामाजिक जाणीव आपल्या विचारातून आणि कृतीतून जोपासत संस्थेने ६००० हुन अधिक लोकांच्या नेत्र तपासण्या मोफत करून पुढील उपचारासाठी मार्गदर्शन केले तसेच गरजू व असाहाय्य वृद्धांचा

▶▶ उर्वरित पान २ वर

# लिंबागणेश येथे उभारला जाणार 101 फूट उंच भगवा ध्वज

### हिंदू संस्कृतीचे भव्य प्रतीक; ग्रामस्थांच्या सहकार्यातून उपक्रमास सुरुवात

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील पवित्र तीर्थक्षेत्र लिंबागणेश येथील भालचंद्र गणपती देवस्थान परिसरात १०१ फूट उंच भगवा ध्वज उभारण्यात येणार आहे. हिंदू संस्कृती, परंपरा व त्यागाचे प्रतीक असलेल्या या भगव्या ध्वजाच्या स्थापनेसाठी १४ जुलै रोजी सोम वारी सकाळी भूमिपूजनाने शुभारंभ करण्यात आला. या ऐतिहासिक क्षणी गावातील प्रतिष्ठित नागरिक, भक्तगण आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ध्वज स्थापनेमागील उद्देश



आणि प्रेरणा- भगवा ध्वज म्हणजे केवळ कापड नव्हे, तर हिंदू धर्माची शौर्यपर परंपरा, एकता, त्याग आणि आध्यात्मिक उन्नतीचे प्रतीक मानला जातो. या ध्वजामुळे लिंबागणेशची धार्मिक ओळख अधिक दृढ होणार असून, भालचंद्र गणपती मंदिराला नव्या आध्यात्मि क उंचीवर नेण्याचा ग्रामस्थांचा संकल्प आहे.

गावकऱ्यांच्या एकतेचा आदर्श उपक्रम- विशेष म्हणजे या उपक्रमासाठी कोणतीही संस्था वा मंडळ पुढे न येता, संपूर्ण ग्रामस्थांनी एकत्र येऊन हे कार्य हाती घेतले आहे. तरुण वर्ग, महिलावर्ग, ज्येष्ठ नागरिक व सर्व भक्तगणांनी श्रम दान, आर्थिक साहाय्य व सक्रिय सहभाग दिला आहे. सामूहिक प्रयत्नातून हा उपक्रम साकारला जात असल्याने सामाजिक ऐक्याचे मूर्त उदाहरण सादर होत आहे.

नियोजनबद्ध कार्यक्रम व धार्मिक वातावरण- ध्वज उभारणीपूर्वी स्तंभबांधकाम, संरचना व परिसर सुशोभीकरणाचे काम नियोजनबद्ध पद्धतीने सुरू आहे. येत्या संकष्टी चतुर्थीपूर्वी भगवा ध्वज उभारण्याचे लक्ष्य असून, ▶▶ उर्वरित पान २ वर